स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**
५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O)2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103,Fax -2690758 E-mail divsec.kop@gmail.com

क्र.कोविम/माध्य.परीक्षा/ जुलै-23/529
दिनांक - 05/06/2023

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा,
सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय :- जुलै-ऑगस्ट २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र(इ.१०वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या तारखांबाबत..**
संदर्भ :- राज्यमंडळाचे जा.क्र.रा.मं./परीक्षा-३/२३६७ दि.०५/०६/२०२३ चे पत्र

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) जुलै-ऑगस्ट २०२३ पुरवणी परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्रे सादर करावयाच्या तारखांबाबतचे प्रकटण सोबत जोडण्यात आलेले आहे तरी सर्व शाळांप्रमुखांनी आपल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन भरुन घ्यावीत. तसेच **शुक्रवार दि.२३/०६/२०२३** राजी आवेदनपत्रे परीक्षा शुल्क चलनासह आपल्या वितरण केंद्राकडे जमा करावीत.

(डी.एस.पोवार),
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

टिप - सर्व वितरण केद्रांनी आपल्याकडे जमा झालेली आवेदन पत्रे शाळानिहाय करुन **मंगळवार दि.२७/०६/२०२३** रोजी विभागीय मंडळ कार्यालयामध्ये जमा करावीत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे — ०४.

जुलै—ऑगस्ट २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १०वी) पुरवणी परीक्षेचे आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांबाबत.

## प्रकटन

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षा मार्च—२०२३ परीक्षेचा निकाल माहे जून २०२३ मध्ये जाहीर झालेला असून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे पुरवणी परीक्षा जुलै—ऑगस्ट २०२३ मध्ये घेण्यात येणार आहे. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षेस पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI विषय घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत. सदर परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने इ. १० वी साठी **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा खालीलप्रमाणे —

| शुल्क प्रकार | माध्यमिक शाळांमार्फत पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (परीक्षेस प्रविष्ठ न झालेले), श्रेणीसुधार व तुरळक विषय घेऊन प्रविष्ठ होणारे, ITI विषय घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाच्या तारखा |
|---|---|---|---|
| नियमित शुल्क | बुधवार, दि. ०७/०६/२०२३ ते शुक्रवार, दि. १६/०६/२०२३ | गुरुवार, दि. ०८/०६/२०२३ ते गुरुवार, दि. २२/०६/२०२३ | शुक्रवार, दि. २३/०६/२०२३ |
| विलंब शुल्क | शनिवार, दि. १७/०६/२०२३ ते बुधवार, दि. २१/०६/२०२३ | | |

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी जुलै—ऑगस्ट २०२३ मध्ये होणाऱ्या परीक्षेची आवेदनपत्रे माध्यमिक शाळांमार्फत भरावी. सर्व माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. ऑनलाईन आवेदनपत्र भरतांना मार्च—२०२३ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन घेता येईल.

२. उपरोक्त परीक्षेस प्रथमतः प्रविष्ठ झालेल्या व श्रेणीसुधार करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जुलै—ऑगस्ट २०२३ व मार्च २०२४ अशा लगतच्या दोन संधी उपलब्ध राहतील याची नोंद घ्यावी.

३. नियमित, विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क चलनाद्वारेच भरण्यात यावे.

४. सर्व विभागीय मंडळातील माध्यमिक शाळांनी निधारित शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बँकेच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच संबंधित विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

५. आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

दिनांक :— ०५/०६/२०२३

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे — ४.